परमाणु ऊर्जा केन्द्रीय विद्यालय

अणुशक्तीनगर, मुंबई

इयत्ता – आठवी | वेळ – 3 तास

विषय –मराठी ( द्वितीय भाषा ) | गुण – 80

---

प्र. 1 ला पुढील उतारावाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

टोमॅटोने आपल्या आंबटगोड चवीने भारतीय जेवणात जागा मिळवली, तर आपल्या झणझणीत चवीच्या बाहेरून आलेल्या मिरचीने स्वतःची जागा निर्माण केली. आज चटणीपासून ते पोहयांपर्यंत आणि आमटीपासून ते लोणच्यापर्यंत पानातल्या प्रत्येक पदार्थांत डोकावणारी मिरचीसुद्धा परदेशीच!

खिरस्तोफर कोलबंस हा मिरचीची चव चाखणारा पहिला युरेपियन मानला जातो. मिरचीची तिखट चव अनुभवल्यानंतर त्याला आठवली काळी मिरी म्हणजे ब्लॅक पेपर. त्यामुळे त्याने या नव्या तिखट फळालाही तेच नाव ठेवलं आणि मग त्याला कळले की, स्थानिक याला 'चिली ' म्हणतात, त्यामुळे त्याने याला ' चिली पेपर ' म्हणायला सुरुवात केली.

a) योग्य पर्याय निवडा 4

1. –––– नी आपल्या आंबट गोड चवीने भारतीय जेवणात जागा मिळवली
   अ) कैरी  ब) टोमॅटो  क) मिरची  ड) ब्लॅक पेपर
2. प्रत्येक पदार्थात डोकावणारी मिरची सुद्धा –––– ।
   अ) स्वदेशीच  ब) परदेशीच  क) गावंठी  ड) स्थानिक
3. मिरचीची चव चाखणारा पहिला व्यक्ती ––– या देशाचा होता.
   अ) अमेरिका  ब) भारतीय  क) युरोपियन  ड) चीन
4. 'स्वदेश' या शब्दाचा विरूध्द शब्द शोधा.
   अ) प्रदेश  ब) पारदेश  क) परदेश  ड) स्वराज्य

b) एका वाक्यात उत्तरे लिहा 4

1. झणझणीत चवीमुळे कोणी स्वतःची जागा निर्माण केली?
2. मिरचीची चव चाखणारा पहिला व्यक्ती कोण?
3. ब्लॅक पेपर या पदार्थाला मराठीत काय म्हणतात?
4. मिरचीला स्थानिक लोक काय म्हणतात?

प्र. 2 खालील कविता वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

उजळणी गिरवून घेणारा,

मायेने अंगा–खांदयावर उचलून घेणारा,

दुखलं खुपलं तर जीवाची ओढाताण करणारा,

मनानं तापट असूनही आईचं वात्सल्य देणारा,

आज एखादा घास तो कमी खाणार,

पण उदयाची काळजी तोच घेणार,

याला कसलाही वाटत नाही भार,

देत असतो मना मनाला आधार,

तो घरात असतो तेव्हा वाटत नाही भिती,

उशीर झाला तर बाबा नावाने आपण

आवाज करतो किती,

a ) एका वाक्यात उत्तरे लिहा 4

1. बाबा कशावर उचलून घेतात?
2. बाबा कशाची ओढताण करतात?
3. बाबा कोणाला आधार देतात?
4. उशिर झाला की आपण कोणाला हाक मारतो

b) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. 3

1. आईचं –––– देणारा
2. ––––– गिरवून घेणारा
3. ––––काळजी घेणारा

प्र.3 रा a) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही 4) 4

1. बंडू हुशार विदयार्थी होता. ( विशेषनाम ओळखा )

अ) बंड्डू ब) हुशार क) विदयार्थी ड) होता

2. खालील पैकी विशेषण असलेला शब्द कोणता?

अ) राधा ब) सुंदर क) आणि ड) होता

3. खालीलपैकी कोणत्या वाक्यक्रियाविशेषण अव्यय आहे.

अ) भाकरीसाठी कष्ट करतो ब) तो सावकाश चालतो

क) राम व श्याम मित्र आहे ड) हिमालय उंच पर्वत आहे

4. खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्ययाचा पर्याय वापरा

पुरेसा पाऊस पडला –––– पेरणी करायची

अ) पण ब) आणि क) की ड) किंवा

5. खालीलपैकी गटात न बसणारे वाक्य कोणते?

अ) अरेरे! बिचारी चिमणी रडवेली झाली.

ब) तो रडत होता

क) आम्ही त्याला बोलावले

ड) त्याने मला खाऊ दिला.

b) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा ( कोणतेही 4 ) 4

1. हिरवे हिरवे गवत नाचत होते. ( वाक्याचा काळ ओळखा )
2. राधा पुस्तक वाचत आहे. ( भूतकाळातील वाक्य तयार करा )
3. अशोकने गाणे गाईले असेल. ( वाक्याचा काळ ओळखा )
4. जेवणाची पंगत बसली होती. ( वर्तमानकाळातील वाक्य तयार करा )
5. त्याला पाण्याची भीती वाटायची. ( काळ ओळखा )

c) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही 4 ) 4

1. केवढा उंच वृक्ष हा । ( वाक्याचा प्रकार ओळखा )
2. देशासाठी त्याग करायला नको का ? ( वाक्याचा प्रकार ओळखा )
3. खूप शिक व मोठा हो. ( वाक्याचा प्रकार ओळखा )
4. हा मनोरा खूप उंच आहे. ( वाक्याचा प्रकार ओळखा )
5. लोकप्रिय व्हावे असे सर्वांनाच वाटते. ( वाक्याचा प्रकार ओळखा )

d) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही 2 ) 2

1. खालीलपैकी एकवचनी शब्द ओळखा

   1) तोरणे 2) घिरटया 3) लाट 4) फुले

2. तिने तो <u>दागिना</u> घातला. ( अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा)
3. ' पंख ' या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

प्र. 4था a) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. ( कोणतेही 2 ) 2

1. खालीलपैकी विरूध्द लिंगी शब्दाचा बरोबर जोडी ओळखा.

   1) कावळा – चिमणी 2) पोपट – राघू 3) गाय – वासरु 4) मोर–लांडोर

2. लिंगानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा

   1) बेडूक 2) वाघ 3) मैना 4) मोर

3. पुढीलपैकी पुल्लिंग शब्द कोणता.

   1) झोपडी 2) घर 3) दार 4) वाडा

b) सूचनेप्रमाणे लिहा 2

1. समानार्थी शब्द लिहा ( कोणतेही 2)

   1) बाग 2) दिवा 3) वारा 4) तरू

2. विरूध्दार्थी शब्द लिहा ( कोणतेही 2 ) 2

   1) उजवा 2) होकार 3) दूर 5) श्रेष्ठ

प्र. 5 वा a) एका वाक्यात उत्तरे लिहा ( कोणतेही 7) 7

1. स्वप्न विक्याच्या मुलाने कोणते शिक्षण घेतले होते?
2. अंगाचं गाठोड करून झाडाखाली कोण पडले होते?
3. लेखिका कोणत्या महिन्यात वहया विकत घ्यायची?
4. सुधीरला बाईनी कोणता प्रकल्प दिला होता ?
5. कवितेची ओळख या पाठात बालकवीच्या कोणत्या रचनांचा उल्लेख आला आहे?
6. श्रुतीने नवीन वर्षाला कोणता संकल्प केला?
7. शेख महंमदच्या बहिणीचे नाव काय?
8. कुत्र्याच्या पिल्लाचे लेखकाने नाव काय ठेवले?

b) योग्य पर्याय निवडा ( कोणतेही 4 ) 4

1. शेख महंमद फार ---- स्वभावाचा होता.

   अ) संकोची ब) अल्लड क) भित्रा ड) निडर

2. मी माझ्या गळयातला ---- त्याच्या अंगावर टाकला.

   अ) ब्लॅकेट ब) मफलर क) कानटोपी ड) स्वेटर

3. श्रुतीने एक ---- खाल्ला

   अ) केक ब) कचोरी क) पुलाव ड) गुलाबजाम

4. गावात येणाऱ्या माणसाला गावकरी --- म्हणत

   अ) फेरीवाला ब) स्वप्नविक्या क) दुकानदार ड) दादासाहेब

5. ------ वाढवणं म्हणजे, काव्यप्रतिभा वाढवणं

   अ) संभाषण ब) निरिक्षण क) आकलन शक्ती ड) श्रवण

प्र 6वा a) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे लिहा. 6

1. स्वप्नविषयी लेखकाचे मत काय होते?
2. लेखक डांग्याला 'पक्क्या हिंमतीच राखण्या ' का म्हणतात?
3. शेख महंमद कोण होता त्याची स्वभाव वैशिष्ट लिहा?
4. सुधीरला बाबांनी कवितेची पुस्तके का आणून दिली?
5. आई श्रुतीवर का रागावली?

b) कंसात दिलेल्या वाक्प्रचाराचा खालील वाक्यात योग्य ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा. 3

( कणव निर्माण होणे, उत्साह वाढणे, भुरळ घालणे, सुसाट पळणे )

1. लहान बाळाचे हसणे माझ्या मनाला आकर्षिक करत होते.
2. भिकाऱ्याची अवस्था पाहून श्यामच्या मनात दया निर्माण झाली.
3. पोलिसांना बघून चोर जोरात पळाला?

c) पुढील इंग्रजी शब्दांसाठी वापरले जाणारे मराठी भाषेतील शब्द लिहा ( कोणतेही 3) 3

1. ऑफिस 2) चेक 3) कॅन्सर 4) ऑपरेशन

प्र. 7 वा a) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही 4) 4

1. कवयित्रीचे मराठी भाषेशी नाते काय आहे?

2. पारिजातकाची फुले पाहून कोणाचा राग विरून गेला?
3. आपल्या पाडसासोबत हिरवळीवर कोण बागडत आहे?
4. आभाळातील मोती कोणाला म्हटले आहे?
5. पावसांच्या थेबांची माळ कोण ओवत आहे?

b) योग्य पर्याय निवडा ( कोणतेही 3 ) 3

1. शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे, ---- आहे गाण्याचा
   अ) तास ब) विषय क) सूर ड) ताल
2. ---- गंधात माझी मराठी भिजली
   अ) मातीच्या ब) रानवाऱ्याच्या क) अमृताच्या ड) मायबोलीचा
3. वरती बघता ---- गोफ दुहेरी विणलासे.
   अ) पक्ष्यांचा ब) इंद्रधनूचा क) कल्पसुमांचा ड) हिरवळीचा
4. तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे -----
   अ) पाण्याचा ब) सोन्याचा क) सरबताचा ड) पैशाचा

c) खालील काव्यपंक्तीचे संदर्भसहित स्पष्टीकरण करा. ( कोणतेही 1) 3

1. तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा?
   आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा
   किंवा
2. माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई
   तिच्या राहावे ऋषात होऊ नये उतराई

प्र. 8 वा a) पत्रलेखन ( कोणतेही 1) 5

1. आंतर शालेय चित्रकला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळपल्याबद्दल मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.
2. तुमच्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्यांना आंमत्रित करणरे पत्र लिहा.

b) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर 150 -200 शब्दांत निबंध लिहा. 7

1. माय मराठी
2. मी पक्षी झालो तर ......
3. पाण्याचे महत्त्व